सकाळ
कोल्हापूर, रविवार, ७ जुलै २०२४

# केंद्रीय सशस्त्र पोलिस दल अधिकारीपदी प्रणाली पाटील


प्रणाली पाटील

घुणकी, ता. ६ : वठार तर्फे वडगाव (ता. हातकणंगले) येथील प्रणाली रमेश पाटील हिची केंद्रीय लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात आलेल्या सीएपीएफएसी परीक्षेतून केंद्रीय सशस्त्र पोलिस दलामध्ये अधिकारी वर्ग - १ पदी निवड झाली. दुसऱ्या प्रयत्नात तिला यश मिळाले.

परीक्षेचा आज शुक्रवारी निकाल लागला. प्रणालीचे प्राथमिक शिक्षण वाठार येथील जिल्हा परिषदेच्या कन्या विद्या मंदीर, माध्यमिक शिक्षण किणी हायस्कूल किणी, बारावीपर्यंतचे शिक्षण कोल्हापुरातील स्वामी विवेकानंद महाविद्यालयात झाले. युपीएससीच्या अभ्यासासाठी प्रणालीने पुण्यातील सिद्धिविनायक महाविद्यालयात बी. ए. ची पदवी तर भूगोल विषमयातून एम.ए.ची पदवी सर परशुराम भाऊ महाविद्यालयात घेतली.

08/07/2024

लोकमत
कोल्हापूर, रविवार, दि. ७ जुलै २०२४

# वाठारची प्रणाली पाटील एसीपीपदी

लोकमत न्यूज नेटवर्क

**किणी :** जिद्द व चिकाटीच्या जोरावर वाठार तर्फे वडगाव (ता. हातकणंगले) येथील प्रणाली रमेश पाटील हिची केंद्रीय सशस्त्र पोलिस दलात असिस्टंड कमांडंट (क्लासवन ऑफिसर) पदावर निवड झाली. यूपीएससीने घेतलेल्या परीक्षेत प्रणालीने हे उज्ज्वल यश संपादन केले.



केंद्रीय लोकसेवा आयोगाने घेतलेल्या परीक्षेचा निकाल शुक्रवारी लागला. प्रणालीचे प्राथमिक शिक्षण वाठार येथील जिल्हा परिषदेच्या कन्या विद्यामंदिर येथे, तर माध्यमिक शिक्षण किणी हायस्कूल व बारावीपर्यंतचे शिक्षण स्वामी विवेकानंद महाविद्यालयात झाले. युपीएससीचे ध्येय ठेवून प्रणालीने पुण्यातील सिद्धी विनायक महाविद्यालयात बी. ए.ची पदवी, तर भूगोल विषयातून एम.ए.ची पदवी सर परशुराम भाऊ महाविद्यालयातून पूर्ण केली. दिल्लीला जाऊन क्लास घेण्यासाठी आर्थिक पाठबळ नसताना जिद्दीच्या जोरावर अध्यात्म गुरू नरेंद्राचार्य, चाणक्य मंडळ यांच्या मार्गदर्शनाखाली मित्र, मैत्रिणींच्या चर्चेतून यश मिळाल्याचे प्रणालीने सांगितले

प्रणालीचे वडील रमेश पाटील हे गावोगावी जाऊन घरगुती साहित्याची विक्री करतात, तर आई घरकाम करतात.